सं.फौ.प्र.क्र.६४२/२०२३
सरकार -वि.- मोहन संबारे
निशाणी क्र.०९ खाली

<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - गणेश विष्णु दहिभाते,

वय - ३० वर्षे, व्यवसाय –मजुरी,

रा. - बेलाड, ता. मलकापुर जि.बुलडाणा

<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....</u>

मी आरोपीला ओळखतो . तो गावातील आहे. घटनेसंदर्भात पोलीसांनी मला कुठेही पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते व माझ्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. आता मला दिनांक ३०/०७/२०२३ रोजीचा अभिलेखावरील जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही.

(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी कलम १५४ भारतीय पुरावा कायदा नुसार देण्यात येत आहे.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०७/२०२३ रोजी पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून विदेशी दारूच्या १८० मी.ली. च्या १० बाटल्या, देशी दारूच्या ९० मी.ली. च्या २७ प्लास्टीकच्या बाटल्या व इतर साहित्य जप्त केले व त्याचा पंचनामा तयार करुन तो मजकुर मला वाचून दाखविला व मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस ओळखत असल्यामुळे आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास- आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.एम निकम यांचेमार्फत सुरु....</u>

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.08.08 18:11:34 +0530

दिनांक : ०८/०८/२०२५

(पी.एस.ठाकरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर.